डिक्री फायनल क्र.२/२०१५

## निशाणी क्रमांक २९ वरील आदेश

०१. अर्जदार यांनी जाबदार यांचे विरुध्द सांगली येथील मा.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली यांचे कोर्टात दाखल केलेला स्पेशल दिवाणी मुकदमा क्रमांक ६०/१९९९ अंशतः मंजूर होवून वाटप केले आहे व त्यानुसार अर्जदार यांनी प्रस्तुतचा डिक्री फायनल अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदर कामी अर्ज कलम ३–ब मध्ये वाद मिळकतीच्या वर्णणामध्ये अनुक्रमांक २ मध्ये भुमापन गट क्रमांक ५३९ ऐवजी भुमापन गट क्रमांक ६३९ व अनुक्रमांक ३ मध्ये भुमापन गट क्रमांक ९५४ ऐवजी भुमापन गट क्रमांक ९४६ असे नजरचुकीने टाईप झालेले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा दुरुस्तीकरीता अर्ज दाखल केला आहे.

०३. अर्जदार यांचे पुढे असे कथन आहे की, सदर दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास जाबदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती नामंजूर केल्यास अर्जदार यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

०४. जाबदार क्रमांक १ ते ४ व ६ यांनी निशाणी क्रमांक ३२ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे. जाबदार यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार यांच्या अर्जातील कारण योग्य व कायदेशीर नाही. अर्जदार यांनी वाद मिळकतीचे वर्णन त्यातील कलम अ मध्ये अर्जदाराने घर मिळकत क्रमांक तसेच क्षेत्रफळ व चतुःसीमा दिलेल्या नसल्याने सदरचा अर्ज चालण्यास पात्र नाही. शेत मिळकत गट क्रमांक ६३९ व ९६४ या जमिनी जाबदारांच्या नव्हत्या व नाहीत. अर्जदार यांनी सौ.रंजना बापूसाहेब पाटील या वारसास रेकॉर्डवर आणले नसल्याने सदरचे अर्जास *नॉन जॉइंडर ऑफ पार्टीज* या तत्वाचा बाध येत असल्याने प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र नसल्याने तो नामंजूर करण्याची विनंती जाबदार यांनी केली आहे.

०५. प्रस्तुत मूळ अर्जातील कथनांचा व प्रस्तुत अर्जातील दुरुस्ती बाबतची मागणी, जाबदार यांचे सदर अर्जावरील म्हणणे निशाणी ३२ व दोन्ही बाजूच्या वकीलांचा तोंडी युक्तीवाद यांचा एकत्रीत विचार करता, हे स्पष्ट दिसून येते की, अर्जदार दावा मिळकतीचे वर्णन अनुक्रमांक २ मध्ये दावा मिळकत भुमापन गट ६३९ ऐवजी भुमापन गट क्रमांक ५३९ व अनुक्रमांक ३ मध्ये दावा मिळकत भुमापन गट क्रमांक ९६४ ऐवजी भुमापन गट क्रमांक ९५४ अशी दुरुस्ती करणेबाबत व तदअनुषंगीक किरकोळ व तांत्रीक स्वरुपाची दुरुस्ती मागत आहे.

०६. निशाणी क्रमांक ३/१ वरील विशेष दिवाणी मुकदमा क्रमांक ६०/१९९९ च्या न्यायनिर्णयामध्ये देखील गट क्रमांक ५३९ व ९५४ असेच नमूद केलेले आहेत. त्यामुळे अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील कथनांस दुजोरा

मिळतो. मूळ अर्जाचे स्वरुप व अर्जदार यांनी मागणी केलेली दुरुस्तीचे स्वरुप पाहता तांत्रीक कारणांचा विचार न करता अर्जदार प्रस्तुत अर्जात मागणी करतात त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यास कोणतीही अडचण असल्याचे दिसून येत नाही. प्रस्तुत दुरुस्तीमुळे जाबदार यांचेवर कोणताही अन्याय होणार नाही. वरील कारणांचा विचार करता, अर्जदार यांचा प्रस्तुत दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे अनुज्ञेय आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्जदार यांचा सदरचा अर्ज कॉस्टची रक्कम रुपये २००/- सरकार जमा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांना प्रस्तुत अर्जात मागणी केलेप्रमाणे अर्ज कलम ३ मध्ये वाद मिळकतीच्या वर्णणामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी सदरची दुरुस्ती या आदेशाचे दिनांकापासून १४ दिवसांचे पूर्वी करण्याची आहे.

Sd/-

तासगांव — ( एस.एस.राऊत )

दिनांक १०.०८.२०१६ — सह-दिवाणी न्यायाधीश क.स्तर,तासगांव.